## कार्यालय पोलीस उप अधिक्षक,लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,जालना

टोल फ्रि क्रमांक १०६४

कार्यालय दुरध्वनी क्र. :- ०२४८२-२२०२५२

:: प्रेस नोट :: दिनांक :- ०८.०५.२०१९

**ग्राम पंचायत विडोळी बु. व वाटुर तांडा ता.मंठा जि.जालना येथील ग्रामसेवक, श्री.वाल्हेकर यांना 3,000/- रुपयाची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालनाच्या पथकाने पकडले**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | श्री.भाऊसाहेब बबन वाल्हेकर, वय ४५ वर्षे,धंदा नोकरी, ग्रामसेवक, ग्राम पंचायत विडोळी बु. व वाटुर तांडा ता.मंठा जि.जालना पंचायत समिती मंठा जि.जालना वर्ग-३ रा.ह.मु.चांगले नगर, अंबड जि.जालना मु.रा.चापडगाव ता.शेवगाव जि.अहमदनगर |
| २ | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दि.०८.०५.२०१९ रोजी पाचोड चौफुली , पाचोड रोड अंबड ता.अंबड जि.जालना येथे. |
| ३ | लाचेची रक्कम | :- | ३,०००/- रुपये |
| ४ | सापळा अधिकारी | :- | श्री.व्हि.एल.चव्हाण, पोलीस निरीक्षक , लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना. |

याबाबत थोडक्यात हकीगत अशी आहे की, तक्रारदार यांचे राहते गावी त्यांचे वडीलांचे नावावर जुने घर आहे. सदरचे घर हे तक्रारदार यांचे नावाने ग्रामपंचायतीला नोंद करुन घेवुन तसा नमुना नंबर ८ देण्यासाठी तक्रारदार यांनी त्यांचे गावचे ग्रामसेवक श्री.वाल्हेकर यांना भेटले असता त्यावेळी ग्रामसेवक श्री.वाल्हेकर यांनी तक्रारदार यांना बॅन्डवर प्रतिज्ञापत्र करुन आणण्याचे सांगीतले होते.त्यानंतर तक्रारदार यांनी तसे प्रतिज्ञापत्र तयार करुन घेतले. दिनांक ०७/०५/२०१९ रोजी तक्रारदार हे पुन्हा त्यांचे गावचे ग्रामसेवक श्री.वाल्हेकर यांना भेटले व म्हणाले की, साहेब माझ्या वडीलाचे नावाने असलेले घर हे माझ्या नावाने ग्रामपंचायतीला करुन तशी नोंद घेवुन तसा नमुना नंबर ८ चा उतारा मला केंव्हा देता त्यावेळी तक्रारदार यांचेकडुन आनलेला बॉन्ड पेपर न घेताच म्हणाले की तुम्ही मला ४०००/ रुपये व बॉन्ड पेपर एकदाच सोबत द्या त्यावेळी तक्रारदार म्हणाले की, साहेब मी आपल्याच ग्रामपंचायतचा शिपाई आहे असे म्हणाले असता त्यावेळ ग्रामसेवक श्री.वाल्हेकर म्हणाले की, ते कांही मला सांगु नको उद्या दुपारी अंबड चौफुली जालना येथे ४०००/ रुपये व बॉन्ड पेपर सोबत घेवुन ये त्याशिवाय मी तुझ्या नावाने तुझ्या वडीलांचे नावे असलेले जुने घर तुझे नावे करणार नाही असे सांगीतल्याने. त्यावर तक्रारदार यांची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी ला.प्र.वि. कडे तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन आज दिनांक ०८.०५.२०१९ रोजी ग्रामसेवक,श्री.वाल्हेकर यांचे लाचेच्या मागणीची पडताळणी अंबड चौफुली येथे जावून केली असता लाच मागणी पडताळणी दरम्यान पंचासमक्ष ग्रामसेवक, श्री.वाल्हेकर यांनी तक्रारदार यांचे कडे वडीलोपार्जीत घर तक्रारदाराचे नावे ग्रामपंचायतला नोंद करुन तसा नमुना नंबर ८ देण्यासाठी तडजोडअंती ३,०००/- रुपये लाचेची मागणी करुन ३,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारणार असुन लाचेची रक्कम अंबड येथे आणून देण्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन दिनांक ०८.०५.२०१९ रोजी पाचोड चौफुली, पाचोड रोड अंबड ता.अंबड जि.जालना येथे लाचेचा सापळा आयोजीत केला असता ग्रामसेवक श्री.वाल्हेकर यांनी पंचा समक्ष ३,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारली असतांना त्यांना लाचेच्या रक्कमेसह पकडण्यात आले. वरील आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्या बाबतची पुढील कार्यवाही चालू आहे.

सदरची सापळा कार्यवाही पोलीस अधिक्षक डॉ.श्री.श्रीकांत परोपकारी, अपर पोलीस अधिक्षक श्री.जिरगे, पोलीस उप अधिक्षक श्री.रविंद्र डी.निकाळजे यांच्या मार्गदर्शनाखाली, श्री.आ.वि.काशिद,पो.नि,श्री.व्हि.एल.चव्हाण, पो.नि. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे जालना कार्यालयाचे कर्मचारी श्री.ज्ञानदेव जुंबड,श्री.मनोहर खंडागळे श्री.उत्तम देशमुख, श्री.अनिल सानप,श्री.आत्माराम डोईफोडे, श्री.महेंद्र सोनवणे,श्री.गंभिर पाटील,श्री.रमेश चव्हाण, श्री.संदीप लव्हारे, श्री.ज्ञानेश्वर म्हस्के,श्री.सचिन राऊत यांनी पार पाडली.

**तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कडुन अवाहन करण्यात येते की कोणी लोक सेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास ०२४८२-२२०२५२, तसेच टोल फ्री क्रमांक १०६४ वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं.७९७२७२६१०१ पोलीस निरीक्षक मो.नं. ९८२३१४२६३२, ९७६७७४७७७४ वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना